1487 0001

# पुणे महानगरपालिका

बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५.

(यापुढील पत्रव्यवहार खालील क्रमांक व दिनांक यांच्या उल्लेखासह करावा)
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला (संमती नकाशासह)
## कमेन्समेन्ट सर्टिफिकेट

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४/४५/५८/६९ यांतील आणि महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट चे कलम २५३ व २५४ यांतील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

प्रकरण क्रमांक : KDB/0085/12
Proposal Type : Residential
Case Type : Revised
Project Type : Proposed Building

क्रमांक : CC/3112/16
दिनांक : 3/1/2017

श्री./श्रीमती Vinod Chandanmal Khivansara द्वारा ला.स.श्री. SACHIN S. SULE (CA\90\13151) यांस राहणार पुणे, पेठ 1794 sadashiv peth pune महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ चे कलमे ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ चे कलमे २५३/२५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील पेठ Kondhwa-Budruk घरांक सर्व्हे नं. 24/1B/3 सि.स.न. _ हिस्सा नं. _ फायनल प्लॉट क्र. _ प्लॉट क्र. _ (.) (सोसायटी) येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक 15/11/2016 रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.

### -: अटी :-

१. सदरचा प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे / रस्ता प्रमाणरेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा. च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.

२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/दुरुस्त इमारतीचा वापर अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तिद्वारे पुणे म.न.पा. चे भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.

३. सदर संमतीपत्राची / विकास परवानगीची मुदत (काम सुरू झालेले नसल्यास) संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील. सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत यावा.

४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहे, असे नूतनीकरण सलग तीन वेळा करता येईल. तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रदेशिक आणि नगररचा अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल. एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.

५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.
   (अ) जागेवरील विकासन/बांधकाम हे मान्य नकाशांप्रमाणे दर्शविलेल्या/संमती केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भग समजण्यात येईल.
   (आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास / झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.
   (इ) अर्जदाराने सदरची परवानगी ही गैरकृत्य करुन पुणे म.न.पा. चे दिशाभूल करुन प्राप्त केलेली आहे, असे निदर्शनास असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली, नियम क्र. ६.१०, महाराष्ट्र म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभूल करुन घेण्यात आली असे समजण्यात येईल.
   (ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वत: किंवा त्याच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करुन महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करुन जमीन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरची परवानगी दिशभूल करुन घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

६. सदर संमतीपत्रावरील/लगत असलेल्या अटी व सूचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस, मुखत्यारधारक, व्यवस्थापक, प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्याद्वारा मालकी हक्क सिद्ध करेल त्या सर्वास कायमस्वरूपी बंधनकारक राहील.

७. काम सुरू करण्यापूर्वी एन. ए. ऑर्डर दाखल करणार.

८. अकृषिक दाखला (एन. ए. ऑर्डर), यु. एल. सी. आदेश, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळ, औद्योगिक संचलनालय, कामगार विमा आयुक्त यांचे आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

वरील संमतीप्रमाणे काम करताना महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होत आहे, असे पुणे म.न.पा. चे निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार पुणे म.न.पा. राहील.
वरील संमतीपत्राविषयी काही शंका येत असेलत तर कामास आरंभ करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

इमारत निरीक्षक
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

उप अभियंता
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

अटी पुढे चालू ....

Scanned by CamScanner